N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** मोर्शी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0260 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/06/2023 02:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 14/06/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/06/2023
   **Time From (वेळेपासून):** 17:51 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/06/2023 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/06/2023 02:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहायक अभियंता, श्री ठाकरे यांच

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.सुरेश निर्मलदास हरवाणी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1960

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of issue** (दिल्याची तारीख):

**Place of issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | प्रभात चैक, मोर्शी ता,नांदगांव पेठ,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | प्रभात चैक, मोर्शी ता,नांदगांव पेठ,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अंकुश सुदभान ठाकरे | | | 1. शांती नगर,यशोदा नगर जवळ, अमरावत,मोर्शी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/Informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15,000/ | 15,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 14/06/2023माझे नाव:- श्री.सुरेश निर्मलदास हरवाणी, वय-63 वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. प्रभात चौक, मोर्शी ता. मोर्शी जि.अमरावती मो-9422682168 मी आज रोजी समक्ष ला.प्र.वि कार्यालय अमरावती येथे येवुन तक्रार देतो की, मी वरील प्रमाणे असुन माझा मोर्शी येथे प्लायवुड विक्रीचा व्यवसाय आहे. मी अंदाजे सन 2018 मध्ये महाराष्ट्र कॉलनी मोर्शी येथे श्री.साहेबराव पांडे यांचे सहा रूम असलेले घर विकत घेतलेले आहे. सदर रूम पैकी 3 रूम या स्पंदना स्फुर्ती फायनान्शीयल लिमीटेड या बँकेला भाडयाने दिलेले असुन उर्वरीत 3 रूम या मी स्वतःसाठी वापरतो. मी वापरत असलेल्या रूममध्ये घरगुती मिटर मुळ मालक श्री.साहेबराव पांडे (ग्राहक क्रमांक- 35678153678) यांचे नावाने असुन भाडयाने दिलेल्या रूम मध्ये व्यावसायीक मिटर हे माझा मुलगा नामे श्री.बादल सुरेश हरवाणी (ग्राहक क्रमांक- 356780107935) यांचे नावे आहे.दि. 12/06/2023 रोजी मी घरी असतांना अंदाजे दुपारी 01::30 वा च्या सुमारास माझे ओळखीचे लाईनमन श्री. रोशन मस्करे यांनी फोन करून मला श्री.अंकुश ठाकरे सहायक अभियंता म.रा.वि.वि कं.मर्या ग्रामिण 2 यांनी माझे महाराष्ट्र कॉलनी येथील घरी बोलावल्याचे सांगितले त्यावरून मी काही वेळात तेथे पोहचलो असता श्री.अंकुश ठाकरे सहायक अभियंता यांनी मला'' तुम्ही मिटर परस्पर शिफ्टींग केलेले असुन तुम्ही वापरत असलेल्या रूम मध्ये घरगुती मिटर लावले आहे पण तुम्ही त्या रूमचा वापर कमर्शीयल साठी करत आहात'' असे म्हटल्याने मी त्यांना '' साहेब, बँकेला माझे नावाचे कमर्शीयल मिटर पाहीजे असल्याने मी वापरत असलेल्या रूमचे माझा मुलगा नामे बादल हरवाणी यांचे नावे असलेले कमर्शीयल मिटर हे त्यांना लावुन दिले '' असे सांगितले त्यावर त्यांनी मला ''तुम्ही जे कमर्शीयलच्या ऐवजी घरगुती मिटर वापरत आहात...हे इलीगल आहे'' असे म्हटल्याने मी त्यांना '' साहेब मी घरगुती मिटर हे राहते घरासाठीच वापरत आहे.'' असे म्हटल्याने त्यांनी मला '' एक काम करा... तुम्ही 20,000 /-रू द्या... मी त्या जागेचे घरगुती ऐवजी कमर्शीयल मीटर करून देतो...'' असे म्हटले असता मी त्यांना नाईलाजाने '' साहेब मी नंतर सांगतो''असे म्हणुन तेथुन निघुन आलो.माझी सहायक अभियंता श्री.अंकुश ठाकरे यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तसेच माझा त्यांच्यासोबत व्यक्तीगत कुठलाही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा कुठलेही भांडण नाही. अशी तक्रार पोनि कडु यांना सांगितली वरून मी सांगितलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरीता पो.नि.अमोल कडु यांनी दोन सरकारी पंच यांना पत्र देवुन त्यांचे कार्यालयात बोलावुन माझा त्यांना परिचय करून दिला. त्यानंतर मी वरील प्रमाणे सहायक अभियंता श्री.ठाकरे यांचेवर कार्यवाही व्हावी असा आशयाची दर्शनव्याने पंचासमक्ष तोंडी तक्रार सांगितली. सांगितलेल्या तक्रारीप्रमाणे पोनि कडु यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टंकलिखीत करून त्याची प्रिंट काढली व त्यावर पंच क्र.1 श्री.काटोले यांनी पेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सह्या केल्या व समक्ष म्हणुन पोनि कडु यांनी सुध्दा सही केली आहे, व त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करून लाचलीच पडताळणी कार्यवाही करणेकरीता खाजगी वाहनाने सर्व सापळा पथकातील स्टाफसह मोर्शी येथे पोहचलो, तेथे मला व पंचास पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करून देवुन माझे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवुन मला पंच क्र.1 श्री.काटोले यांचेसह सहायक अभियंता श्री.अंकुश ठाकरे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले. त्यावेळी माझी व सहायक अभियंता श्री.अंकुश ठाकरे यांची त्यांचे कॅबीन मध्ये भेट झाली असता श्री.ठाकरे साहेब यांच्या सोबत काही वेळ बोलुन झाल्यावर श्री. ठाकरे यांनी मला तुमच्या घरी जाउन पाहणी करून घेवु असे म्हटले व आम्ही माझ्या घरी महाराष्ट्र कॉलनी येथे गेलो असता त्याठिकाणी मी त्यांना '' एकवीस व सांगितल होत ...खुप जास्त होत ना...साहेब...'' असे म्हटले असता त्यांनी मला त्यांचा मोबाईल मध्ये 20,000/-रू आकडा टाईप करून ''ऐवढे करून टाका...मोकळ करून टाका...'' म्हटले त्यावर मी त्यांना '' किती... विस हजार... विस हजार जास्त होते ना साहेब... काही तर कमी पण पंधरा करून टाका...बस '' असे म्हटले असता त्यांनी मला '' १५००० पक्का करून टाका... आताच करून टाका'' असे म्हटले त्यानंतर आम्ही दोघेही त्यांच्या कार्यालयात गेलो व त्यानंतर मी पंचासोबत तेथुन निघुन परत आलो. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.ठाकरे यांनी मला माझ्या मालकीचे घराचे घरगुती वापराचे विज मिटर हे

तडजोडी अंती 15,000/-रू
व्यावसायीक विज मिटर मध्ये बदली करून देण्यासाठी (कमर्शीयल करून देण्यासाठी) लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले त्यावरून सहायक अभियंता श्री.ठाकरे यांचे विरूध्द सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर पोनि कडु यांनी सहायक अभियंता श्री. ठाकरे यांचेवर सापळा कारवाई करणार असल्याचे सांगुन मला लाचेची रक्कम 15,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता माझ्याकडे असलेले 15,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 30 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक पो.नि.कडु यांनी पंच क्र.2 श्री.कोटगले यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.1 श्री.काटोले यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व पोनि कडु यांनी सहया केल्या.त्यानंतर पो.नि.कडु यांच्या सुचनेवरून स्टाफ आशिष जांभोळे यांनी मी हजर केलेल्या नोटाला अॅन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर हजर केलेल्या लाच रक्कमेला अॅथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम माझे पॅटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली. व पोका.कैलेष कडु यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करून देवुन मला व पंच क्र.1 श्री.काटोले यांचे सह माझ्या दुचाकी वाहनाने सहायक अभियंता श्री.ठाकरे यांची भेट घेण्याकरीता म.रा.वि.वि.क.मर्या., कार्यालय, मोर्शी येथे रवाना केले. त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे वेगवेगळया वाहनाने म.रा.वि.वि.क.मर्या. कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा मी व पंच क्र.1 श्री.काटोले असे म.रा.वि.वि.क.मर्या. कार्यालय मोर्शी येथे गेलो असता कार्यालयात सहायक अभियंता श्री.ठाकरे हजर होते तेव्हा मी त्यांची भेट घेतली असता त्यांना मी त्यांना पैसे बाबत ''थॅक्यु सर बाकी आता लक्ष ठेवजा माझ्यावर... हे घ्या '' असे म्हटले असता त्यावर त्यांनी मला '' टेबलवर ठेवुन दया द्या आता काही प्रॉब्लेम नाही येणार'' असे म्हटल्याने मी माझे जवळ असलेली 15,000/- रूपये लाचेची रक्कम त्यांच्या समोरील टेबलवर ठेवली. त्यानंतर मी तेथुन निघुन येवुन सापळा पथकास लाच स्विकारल्याबाबत पुर्व नियोजित इशारा केला. त्यावेळी आपण सर्वजण येवुन सहायक अभियंता श्री.ठाकरे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पो.नि.कडु यांनी त्यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचा परिचय करून दिला. तेव्हा पोशि कैलेष कडु यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर पो.नि.कडु यांनी सहायक अभियंता श्री.ठाकरे यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. अंकुश सुर्यभान ठाकरे, वय 42 वर्षे, पद -सहायक अभियंता, म.रा.वि.वि.क.मर्या. मोर्शी ग्रामिण क्र. 2 ता. मोर्शी जि.अमरावती रा.शांती नगर, यशोदा नगर जवळ, अमरावती असे सांगितले. त्यानंतर पोनि. कडु यांनी तेथे माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी सहायक अभियंता श्री.ठाकरे यांनी त्यांचे समोरील टेबलवर ठेवण्यास सांगितले होते ती लाच रक्कम पो.नि.कडु यांनी सहायक अभियंता श्री.ठाकरे यांचेकडुन पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला. तरी दि.14/06/2023 रोजी मला म.रा.वि.वि.क.मर्या. मोर्शी ग्रामीण क्र. 2 येथील सहायक अभियंता श्री.ठाकरे यांनी मला माझ्या मालकीचे घराचे घरगुती वापराचे विज मिटर हे व्यावसायीक विज मिटर मध्ये बदली करून देण्यासाठी (कमर्शीयल करून देण्यासाठी) तडजोडी अंती 15,000/-रू लाचेची मागणी करून रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्यान 15,000/- रुपये लाचेची रक्कम वेळ अंदाजे 17.51 वा. ते 18.10 वा. च्या दरम्यान म.रा.वि.वि.क.मर्या. मोर्शी ग्रामीण क्र. 2 येथे त्यांचे कॅबीन मध्ये स्विकारल्याने श्री.अंकुश सुर्यभान ठाकरे, वय 42 वर्षे, पद -सहायक अभियंता, म.रा.वि.वि.क.मर्या. मोर्शी ग्रामिण क्र. 2 ता.मोर्शी जि.अमरावती रा.शांती नगर,यशोदा नगर जवळ,अमरावती यांचे विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढुण ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NIRANJAN Sukhdeorao UKANDE
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** POBN59957
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S.T. Harwani

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी यांची सही)
पोलीस स्टेशन,गोंशी
**Name (नाव):** SHRIRAM DEVRAOJI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**